**<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री.आर.ई.भुरकापल्ले वकिल यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

**०६.** एक महिन्यापुर्वी वादी आणि माझी भेट झाली. हे खरे की, ती मला बोलत होती. हे खरे नाही की, ती प्रवास करु शकते. हे खरे की, मृत्युपत्राआधारे वादीच्या नावे जमीन केंव्हा झाली हे मला माहिती नाही. हे खरे की, त्यातील मजकुराची मला माहिती नाही. हे खरे की, वादीच्या नावे स.क्र.२६१/३/४ मध्ये किती जमीन शिल्लक आहे व किती जमीन विकली, हे मला माहिती नाही. हे खरे की, या जमिनीचा किती क्षेत्राचा ७/१२ उतारा तिच्या नावे आजरोजी आहे, हे मला माहिती नाही. हे खरे की, लक्ष्मण वैजन्नाथ चाटे याच्या नावे त्या जागी आज किती क्षेत्र आहे, हे मला माहिती नाही. हे खरे की, विक्री केलेले क्षेत्र वगळता वादीचा उर्वरीत शिल्लक जमिनीवर कब्जा आहे. हे खरे की, दावा कोणाच्या विरुध्द दाखल केला आहे, हे मला माहिती नाही. संजय बोंडगे यांच्याविरुध्द कोणताही दावा नाही, याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, सरतपासातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नाही. हे खरे नाही की, माझा प्लॉट वादीच्या प्लॉटच्या पुर्वेला आहे, असे मी खोटे सांगतो. हे खरे की, वाद मिळकतीच्या चतु:सीमा मला सांगता येत नाहीत.

**प्रतिवादी क्र.१ साठी उलटतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.२ तर्फे श्री.उप्पे वकिल यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

**०७.** साक्ष देण्यापुर्वी मी वादीकडून दाव्याची माहिती घेतली होती. वादीने दावा का केला आहे हे मला माहित नाही. वादीने संजय शिवपुजे याला करुन दिलेले खरेदीपत्र मला माहिती नाही. हे खरे की, संजयने जयवंत नागरगोजे याला करुन दिलेल्या खरेदीपत्राची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला करुन दिलेल्या खरेदीपत्राची मला माहिती नसल्याने सरतपास परिच्छेद क्र.५ मधील शेवटचे वाक्य वादीच्या सांगण्यावरुन लिहिले. हे खरे की, वाद मिळकतीत वादीने अनेक भूखंड तयार केले व लोकांना विकले.

हे खरे की, विकलेल्या भूखंडाचा ताबा त्या-त्या लोकांना वादीने दिलेला आहे. हे खरे की, वाद जमिनीतून अहमदपूर-अंबाजोगाई रस्ता गेल्याने त्याच्या किंमती वाढल्या आहेत. संजय बोंडगे व संजय शिवपुजे या दोन वेगवेगळया व्यक्ती आहेत. हे खरे की, मी संजय बोंडगेच्या दाव्यात शपथपत्र दिले. हे खरे की, वादीच्या सांगण्यावरुन मी साक्षीला आलो आहे. हे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर माझ्या माहितीतील नाही व मी वादीच्या सांगण्यावरुन नमूद केला आहे. हे खरे की, या जमिनीच्या किंमती वाढलेल्या आहेत. हे खरे की, प्रतिवादींना ओळखायचे मला कारण नाही. हे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.२ साठी उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक:१०/०३/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**